


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : २४८ ● पुणे ● बुधवार, दि. २० ऑगस्ट २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313

# सिंहगड रस्तावासीयांना पुन्हा मनस्ताप

## पाऊस, प्रशासनाच्या नियोजन शून्य कारभारामुळे वाहतूक कोंडी



### असा झाला परिणाम

- इनामदार चौकात नागरिकांची त्रेधातिरपीट
- चाकरमान्यांना कार्यालयात जाण्यास उशीर
- कोंडीमुळे कालवा रस्त्यावरील वाहतूकही विस्कळित
- महादेवनगरपर्यंत वाहनांच्या रांगा
- रस्त्यावरील कामामुळे चारचाकी चालकांची तारांबळ

**सिंहगड रस्ता (दै. आरंभ पर्व)**

दोन दिवसांपासून होत असलेल्या जोरदार पाऊस आणि अचानक उद्भवलेल्या रस्त्याच्या कामांमुळे सिंहगड रस्ता परिसरात वाहतूक कोंडी झाली होती. विठ्ठलवाडी परिसरात महापालिकेने अचानक काम सुरू केले. त्यामुळे प्रकाश इनामदार चौकात वाहतुकीला अडथळा निर्माण होऊन रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

महापालिकेच्या नियोजन शून्यतेमुळे सिंहगड रस्तावासीयांना नेहमीप्रमाणे पुन्हा एकदा कोंडीचा सामना करावा लागला. सिंहगड रस्त्यावरील उड्डाण पुलाच्या उद्घाटनाची तारीख अद्याप निश्चित नसताना विश्रांतीनगर येथील प्रकाश इनामदार चौकातील दुभाजक अचानक बंद करण्यात आला. हे काम सकाळच्या गर्दीच्या वेळेत सुरू होते. पुलाखालच्या एका बाजूला दुभाजक टाकण्याचे, तर दुसऱ्या बाजूला पादचारी मार्गाचे काम सुरू होते. यामुळे येथे सर्व बाजूंनी वाहतुकीला अडथळा निर्माण होऊन नागरिकांना सकाळच्या घाईच्या वेळेतच कोंडीचा सामना करावा लागला.

माणिकबाग, आनंदनगर, हिंगणे या भागातून येणारी वाहने तुकाईनगर, दामोदरनगर, महादेवनगर, आनंद विहार, विश्रांतीनगर या भागातून कालवा रस्त्याने येणारी वाहने आणि राजाराम पुलाकडून हिंगणे अथवा विश्रांतीनगरच्या दिशेने जाणारी वाहने अशी सर्वच वाहने त्या ठिकाणी एकत्र आल्याने कोंडीत भर पडली. सोबतच कालवा रस्त्यावरून येणाऱ्या वाहनांना इनामदार चौकात अडथळा झाल्याने थेट दामोदरनगरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. पोलिस अंमलदार सुहास हजारे, उमेश तिकोळे, अमित पुजारी, श्रीकांत सरगर व महिला पोलिस कर्मचाऱ्यांनी विश्रांतीनगरच्या चौकातील दगड बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.






# शोककथेची प्रस्तावना



गेल्या दोन दिवसांत मुंबईच्या जनजीवनाची जी त्रेधातिरपीट उडाली, त्यात खरंतर नवं काही नाही. दरवर्षी हे असंच होत असतं. नवीन आहे, ते पुणे आणि नव्याने वाढलेल्या अन्य शहरांच्या नागरी सुविधांचं झालेलं वस्त्रहरण. 'स्मार्ट सिटी' वगैरे सोडाच; पण पुण्यात पूर्वी जिथे पिण्याच्या पाण्याची मारामार होती, तिथे आता गुडघ्याच्या वर पाणी साचू लागलं आहे. एकेकाळच्या सायकलींच्या, त्यानंतर दुचाकींच्या या शहरातील रस्ते गाड्यांच्या वाहतुकीने तुंबू लागले आहेत. अन्य बाबतीत जाऊ द्या, पण नागरी असुविधा आणि शहर अनास्थेच्या बाबतीत पुण्याने मुंबईशी बरोबरी केली, हे मान्य करावंच लागेल! नाशिक, औरंगाबाद, नागपूर किंवा कोल्हापूरसारख्या अन्य शहरांत या दोन दिवसांत मुंबई - पुण्यासारखा पाऊस झाला नाही म्हणून. अन्यथा, या शहरांचे चेहरेही या दोन महानगरांपेक्षा वेगळे नसते! मराठवाडा आणि कोकणात पावसाने चांगलंच नुकसान केलं आहे. विशेषतः मराठवाड्यातल्या संत्र्या-मोसंबीच्या बागा आणि दोन्ही विभागातल्या शेतातल्या उभ्या पिकांची प्रचंड नासधूस झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलेल्या प्राथमिक अंदाजानुसार राज्यात सुमारे १२ ते १४ लाख हेक्टर जमिनीवर पिकांचं नुकसान झालं आहे. हे नुकसान प्रचंड आहे. श्रावणाच्या अखेरच्या पर्वात झालेल्या बेधुंद पावसाने हाता-तोंडाशी आलेली पिकं; काही ठिकाणी तर शेतजमीनही अक्षरशः वाहून नेली आहे. महानगरं आणि शहरात जनजीवन विस्कळीत झाल्याने होणारं नुकसान आणि ग्रामीण भागात शेतीमातीचं झालेलं नुकसान मोजलं, तर हा आकडा नक्कीच काही हजार कोटींत जाईल. जनजीवन विस्कळीत झाल्याने झालेल्या नुकसानीची भरपाई सरकारला करावी लागत नाही. पण, पिकांच्या नुकसानीची भरपाई सरकारला द्यावी लागते. पीक विमा योजनेतल्या अलीकडच्या बदलांमुळे मुळात शेतकऱ्यांचा या योजनेला असलेला प्रतिसाद अगदी अल्प राहिला आहे. त्यामुळे, या नुकसानीची जबाबदारी सरकारलाच घ्यावी लागेल. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या येत्या निवडणुकीचा विचार करून नुकसानीचे पंचनामे आणि भरपाई करायची झाली,



तर तो आकडा मोठा असेल, यात शंका नाही.

महाराष्ट्रात नागरिकरण वेगाने होते आहे, हे जगजाहीर आहे. महाराष्ट्रातली स्थलांतरितांची संख्या वाढते आहे. गावातून निमशहरी भागात आणि शहरांत होणाऱ्या स्थलांतराचं प्रमाणही वाढतंच आहे. त्यामुळे, नागरी वस्तीसाठी अधिकाधिक जमीन वापरली जाते आहे. नागरी वस्ती म्हणजे केवळ घरं नव्हेत. घरांबरोबरच रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, वीजपुरवठा अशा अनेक सुविधा येतात. बदलत्या जीवनशैलीनुसार या व्यवस्था अद्ययावत असणं गरजेचं आहे. पण, दुर्दैवाने त्या तशा दिसत नाहीत. आधीच्या नसतील, तर त्यात तक्रार करण्यासारखं काही नाही. पण, ज्या नव्याने होत आहेत, त्याही येत्या ५० वर्षांच्या नियोजनाने आखल्या जात आहेत, असं दिसत नाही. त्यांच्या दर्जाचा प्रश्न तर आणखी वेगळा! दोन-तीन दिवसांच्या मुसळधार पावसाने किंवा एखाद्या ढगफुटीने या व्यवस्थांच्या आरेखनात शास्त्रीय बाबी काटेकोरपणे पाळल्या नसल्याचं वारंवार दिसून येतं आहे. पावसाचा कालावधी कधी लांबतो आहे, तर कुठे कमी होतो आहे. पावसाचं प्रमाण तेवढंच असलं, तरी अगदी कमी काळात तीव्र पर्जन्यवृष्टीच्या घटना दरवर्षी घडू लागल्या आहेत. त्यालाच आपण सोप्या भाषेत 'ढगफुटी' म्हणतो. जर हे दरवर्षीच कुठे ना कुठे घडू लागलं असेल, तर त्याबाबत तक्रार तरी किती करणार? आणि किती वेळा आपल्या नगर नियोजनशून्यतेसाठी तेच कारण पुढे करणार? निसर्गाचं चक्र अजून पूर्णपणे माणसाच्या हातात आलेलं नाही. त्यामुळे, निसर्गाचा कल पाहून आपल्याला आपलं जगणं बदलावं लागणार आहे, नियोजनात आवश्यक सुधारणा कराव्या लागणार आहेत. तीव्र पर्जन्यमान हेच यापुढचं 'न्यू नॉर्मल' आहे, हे लक्षात घेऊन त्यादृष्टीने काळजी घ्यावी लागेल. नवे उपाय शोधावे लागतील. गेल्या दहा वर्षांत त्यादृष्टीने काडीचाही बदल झालेला दिसत नाही. राज्याचं नियोजन करणारा विभाग, नगर विकास-ग्रामीण विकास विभाग, नगररचना विभागाला हे आव्हान स्वीकारावं लागेल. त्यासाठी तज्ज्ञांची मदतही घ्यावी लागेल. मुळात लोकप्रतिनिधी आणि सरकारशिवाय काम करणाऱ्या या क्षेत्रातील संस्था आणि तज्ज्ञांना त्यासाठी आग्रह धरावा लागेल. केवळ निविदा आणि 'सुप्रमा' यातच गुंतलेल्या व्यवस्थेला त्याचं भान देऊन जागं करावं लागेल.

वातावरणीय बदलाची चर्चा होते, पण त्यावरच्या स्थानिक उपाययोजनांसाठी फार काही होताना दिसत नाही. 'वातावरणीय बदल' हा विषय काही केवळ चर्चासत्र आणि परिसंवादासाठी नाही. गेल्या दोन दिवसांत कोकण, मुंबई - ठाणे - पुणे, मराठवाडा आणि महाराष्ट्रातील अन्य काही भागांत जनजीवनाची जी दैना झाली, त्याचं कारण वातावरणीय बदलही आहे. 'बदलही' म्हणण्याचं कारण एवढंच, की सारं खापर या एका कारणावर फोडूनही चालणार नाही. शहर नियोजनात घ्यावयाची काळजी आपण विसरून गेलो आहोत. शहरं आपल्याला फक्त सोन्याचं अंडं देणाऱ्या कोंबड्या वाटतात. 'तरंगते चटई क्षेत्र', 'हवेतले काल्पनिक भूभाग' आणि त्याच्या वाढत जाणाऱ्या रकमा शहर नियोजनाच्या मुळावर आल्या आहेत. जमिनीचे अवास्तव भाव आणि त्यामुळे जमीन चोरण्याच्या वापरल्या जाणाऱ्या क्लृप्त्या या दैनेला जबाबदार आहेत. हे केवळ महानगरं आणि शहरातच होतं आहे, असं नाही. गावातल्या ओढ्या-नाल्यांवरची अतिक्रमणं, नदीपात्रात हातपाय पसरणारी बांधकामं, पर्यावरणाच्या दृष्टीने घातक असलेलं बेहिशेबी सिमेंटीकरण या नुकसानीला कारणीभूत आहे. हा प्रश्न केवळ कोणाच्या खिशातून कोणाचे खिसे भरण्याचा नाही. सामान्य असो, की असामान्य; प्रत्येकाच्या जगण्याच्या गळ्याशी हे एक दिवस येणारच आहे. ही केवळ प्रस्तावना आहे. पुढची शोककथा यावरूनच समजून घेण्यातच शहाणपण आहे.

### सामाजिक कार्यकर्ते अरुण पवार यांचा वाढदिवस

# ग्रंथदान, वृक्षदान, शालेय साहित्य वाटप कार्यक्रमानी साजरा उत्साहात साजरा

## ह.भ.प. निवृत्ती महाराज कदम धाराशिवकर यांनी प्रवचनातून दिला आशीर्वाद

**पिंपरी, चिंचवड (दै. आरंभ पर्व)**

मराठवाडा जनविकास संघाचे संस्थापक अध्यक्ष व राज्यस्तरीय छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार प्राप्त वृक्षमित्र , तळमळीचे सामाजिक कार्यकर्ते अरुण पवार यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. आळंदीचे माऊली महाराज (मोठे) कदम यांचे वडील ह.भ.प. निवृत्ती महाराज कदम धाराशिवकर यांनी अरुण पवार यांच्या वाढदिवसानिमित्त प्रवचन सेवा देत वाढदिवस अभिष्टचिंतन केले.




सामाजिक कार्यकर्ते वृक्षमित्र अरुण पवार यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त ग्रंथदान स्वरूपात ७५० ज्ञानेश्वरी ग्रंथ, १२५ तुकाराम गाथा ग्रंथ, १२५ संविधान प्रत, ५७०० वृक्षांची रोपे, ४०० गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. तसेच नागरिकांसाठी सुरू करण्यात आलेल्या स्मार्ट कार्ड सेवेचा शुभारंभ अभिनेत्री साक्षी चौधरी व गुरुवर्य माऊली योग सेंटरच्या योगशिक्षिका मीनाक्षी खैरनार यांच्या हस्ते करण्यात आला. यामध्ये मतदान कार्ड, आयुष्यमान भारत कार्ड, आधार कार्ड यांचे स्मार्ट कार्ड मोफत करून देण्यात आली. सुदर्शन नगर पिंपळे गुरव, नवी सांगवी, सांगवी, जाधववाडी, चिखली घरकुल आदी ठिकाणच्या ४७०० नागरिकांनी आयुष्यमान भारत कार्डचा लाभ घेतला.

ह.भ.प. निवृत्ती महाराज कदम धाराशिवकर म्हणाले, की अरुण पवार यांनी प्रतिकूल परिस्थितीतून जिद्द, कष्टाच्या जोरावर प्रामाणिकपणे केलेल्या प्रयत्नांचे हे यश प्रेरणादायी आहे. भावी आयुष्यातही ते मोठी झेप घेतील, असा विश्वास आहे. कारण संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरू तुकाराम महाराज यांचा कृपाशिर्वाद त्यांना आहे. हजारो झाडांना दिलेले जीवनदान दिले आहे. या वृक्षांचे आशीर्वादही त्यांना समाजसेवा करण्यास बळ देत आहेत. ते कोणत्याही क्षेत्रात गेले तरी अंतःकारणातला माऊली विसरला जाणार नाही, याची खात्री आहे.

ह.भ.प. मारुती माऊली कोकाटे सुतारवाडी यांनी अरुण पवार यांच्या व्यावसायिक यशात कुटुंबाची साथही महत्वाची असल्याचे सांगत त्यांच्या कार्याची प्रशंसा केली. त्यांच्या पाठीशी फक्त लोकच नाहीत, तर वृक्षांचा आशीर्वाद आहे, ही मोठी गोष्ट आहे. तो आशीर्वादच त्यांना सर्वकाही देऊन जात आहे.

दरम्यान, अभिष्टचिंतन निमित्त धाराशिव येथील संत तुकाराम महाराज भजनी मंडळ, विठ्ठल रुक्मिणी भजनी मंडळ, विश्वगुरू भजनी मंडळ यांचा भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी ह.भ. प. मारुती माऊली कोकाटे, ह. भ.प. बब्रुवान वाघ महाराज, ह.भ.प.बाबुराव तांदळे महाराज, समाज प्रबोधनकार शारदाताई मुंढे, महाराष्ट्र राज्य वारकरी महामंडळाचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष विजूअण्णा जगताप, ह.भ.प. धारु मामा बालवडकर, भंडारा डोंगर मंदिर संस्थान समितीचे अध्यक्ष ह.भ.प. बाळासाहेब काशीद पाटील, ह.भ.प. जगन्नाथ नाटक पाटील, सेवानिवृत्त पोलीस महानिरीक्षक कारागृह विठ्ठलराव जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे नेते राहुल कलाटे, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, माजी नगरसेवक राजेंद्र जगताप, लोकनियुक्त सरपंच बालाजी पवार, पिंपळे गुरव भैरवनाथ मंदिर समितीचे अध्यक्ष राजेंद्र जगताप पाटील, इम्रान शेख, माजी नगरसेवक अतुल शितोळे, तानाजी जवळकर, शामभाऊ जगताप, माजी स्वीकृत नगरसेवक गोपाळ माळेकर, शिवाजी पाडुळे, अमरसिंग आदियाल, उद्योजक बाळासाहेब काकडे, बाबुराव शितोळे, प्रकाश इंगोले, कॅप्टन युवराज माने, अभिमन्यु पवार, धनाजी येळकर, अनिताताई पांचाळ, गणेश पाडुळे, कॅप्टन बालाजी पांचाळ, विमलताई घोडे, संदीप राठोड, प्रा. विष्णू शेळके, अभिमन्यु पवार, अभिमन्यू गाडेकर, ॲड. अतुल पाटील, ॲड. मनोज मोरे, सुर्यकांत कुरुलकर, देवेंद्र तायडे, वामन भरगंडे, प्रवीण कदम, दत्तात्रय धोंगडे, युवराज माने, बळीराम माळी, नामदेव पवार, शशिकांत दुधारे, पुनाजी रोकडे, सखाराम वालकोळी, बाळासाहेब साळुंखे, शंकर तांबे, कॅप्टन राजेंद्र कांबळे, ह.भ.प. अशोक ढोरे पाटील, ह.भ.प. सूर्यकांत ढोरे ह.भ.प. बाळासाहेब शितोळे, ह.भ.प. रमेश ढोरे, सौरभ शिंदे, संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक संघ, भैरवनाथ जेष्ठ नागरिक संघ, भीष्माचार्य ज्येष्ठ नागरिक संघ, हास्य योग परिवार सुदर्शन नगर, हास्य योग परिवार पिंपळे गुरव आदी मान्यवर उपस्थित होते.

सूत्रसंचालन सोमनाथ नाडे यांनी, तर आभार वामन भरगंडे यांनी मानले.

# थोडक्यात




- सुप्रसिद्ध लेखक आणि वक्ते प्रफुल्ल केतकर यांच्या हस्ते होणार प्रदान
- डॉ. संजय तांबट, प्रशांत खरोटे, सतीश वैजापूरकर, मुक्ता चैतन्य आणि आरजे शोनाली यांना पुरस्कार जाहीर

## देवर्षी नारद माध्यम पुरस्कार जाहीर

पुणे (आरंभ पर्व) : दि. १८ ऑगस्ट विश्व संवाद केंद्र आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या वतीने माध्यम क्षेत्रात उल्लेखनीय कार्यासाठी देण्यात येणारे आद्य पत्रकार देवर्षी नारद पत्रकारिता पुरस्कार २०२५ जाहीर झाले आहेत. ज्येष्ठ पत्रकार पुरस्काराने सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता (डीन) आणि वृत्तपत्र विभागाचे प्रमुख डॉ. संजय तांबट, छायाचित्रकार प्रशांत खरोटे, बातमीदार सतीश वैजापूरकर, डिजीटल इन्फ्लुएन्सर मुक्ता चैतन्य आणि आरजे शोनाली यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. अशी माहिती विश्व संवाद केंद्राचे अध्यक्ष अभय कुलकर्णी आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे परिषद व नियामक मंडळाचे कार्यवाह आनंद काटीकर यांनी पत्रकार परीषदेत दिली. शुक्रवार दि. 22 ऑगस्ट रोजी सायंकाळी ५.३० वाजता फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ॲम्फी थिएटरमध्ये पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. सुप्रसिद्ध लेखक, वक्ते, ज्येष्ठ पत्रकार आणि दिल्ली येथील ऑर्गनायझर मासिकाचे संपादक प्रफुल्ल केतकर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येईल. 'राष्ट्रीय सुरक्षा आणि प्रसार माध्यमे' या या विषयावर यावेळी केतकर यांचे व्याख्यान होणार आहे. विश्व संवाद केंद्राचे अभय कुलकर्णी म्हणाले की, राष्ट्रीय विचारांनी प्रेरित विश्व संवाद केंद्राचे देशभरात ३० हून अधिक केंद्र कार्यरत आहेत. २०१४ मध्ये पुण्यात स्थापन झालेल्या या केंद्राचे कार्यक्षेत्र पश्चिम महाराष्ट्र आहे. हे केंद्र राष्ट्रीय विचारांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी माध्यमांशी समन्वय साधून माहितीची देवाणघेवाण करते. आद्य पत्रकार म्हणून देवर्षी नारद यांना ओळखले जाते. त्यांच्या नावाने दरवर्षी दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांचे हे १४ वे वर्ष आहे. यावेळी, पश्चिम महाराष्ट्रातील माध्यम क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या पाच माध्यमकर्मींना सन्मानित करण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरूप ज्येष्ठ पत्रकाराला २१ हजार रुपये रोख आणि देवर्षी नारदांची मूर्ती, तर अन्य चार माध्यमकर्मिना प्रत्येकी ११ हजार रुपये रोख आणि देवर्षी नारदांची मूर्ती असे आहे. यापूर्वी पुरस्कार मिळालेल्या मान्यवरांमध्ये, 'झी २४ तास'चे डॉ. उदय निरगुडकर, 'तरुण भारत'चे किरण ठाकूर, 'महाराष्ट्र टाइम्स'चे पराग करंदीकर, 'सकाळ'चे सम्राट फडणीस, लोकमतचे विजय बाविस्कर, 'देशदूत'च्या वैशाली बालाजीवाले अशा १२ जणांचा समावेश आहे.




# अमली पदार्थ विरोधी मोहिमेतील कार्यकर्त्यांचा सन्मान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

**विनाशाच्या मार्गावर चाललेल्या तरुणाईला बाहेर काढून त्यांना राष्ट्रउभारणीच्या कार्यात सहभागी करून घेण्यासाठी या मोहिमेची व्याप्ती व्यापक करण्यात येणार आहे. शनिवार दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता, लेडी रमाबाई हॉल, एस पी कॉलेज, पुणे ३० या ठिकाणी हा कार्यक्रम संपन्न होणार असून या सेवाकार्यात पुणेकरांनी सहभागी व्हावे असे आवाहन अमली पदार्थ विरोधी मोहिमेचे समन्वयक, समुपदेशक आणि महाराष्ट्र राज्य युवा धोरण समितीचे तज्ञ सदस्य प्रा. डॉ. मिलिंद भोई यांनी केले आहे.**

गेली तीस वर्षे सामाजिक, वैद्यकीय क्षेत्रात विविध प्रकल्प राबविणाऱ्या स्लाईड शो याद्वारे जनजागरण करण्याचे कार्य सुरू आहे. भोई प्रतिष्ठानच्या वतीने गेली वीस वर्षे अमली पदार्थ विरोधी व्याख्याने, प्रदर्शन, याच मोहिमेचा एक भाग म्हणून गतवर्षी गणेशोत्सवात अमली पदार्थ मुक्त गणेशोत्सव ही संकल्पना राबवण्यात आली होती. यामध्ये अमली पदार्थ मंडळांनी या जनजागरण मोहिमेत सहभाग घेतला होता. विरोधी निबंध, घोषवाक्य, चित्रकला स्पर्धा यासोबतच अनेक गणेशोत्सव त्यांच्या या सेवाकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कृतज्ञता समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये या सर्व गणेश भक्तांचा सन्मान करण्यात येणार असून यंदाच्या गणेशोत्सवात सुद्धा ही मोहीम अधिक व्यापक स्वरूपात राबवण्याचा संकल्प करण्यात येणार आहे. राज्यसभा खासदार डॉ. सौ. मेधा कुलकर्णी, विधान परिषदेचे सदस्य श्रीकांत भारतीय, आ. हेमंत रासने, पुण्याचे सह पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, महाराष्ट्र पोलीस अमली पदार्थ विरोधी टास्कचे पोलीस उपमहानिरीक्षक प्रवीण पाटील, अपर पोलीस आयुक्त संजय पाटील, ज्येष्ठ विचारवंत कृष्णन श्रीनिवासन आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# सहकार मंत्रालयाचे अथक प्रयत्न उल्लेखनीय : दिलीप संघाणी

**केंद्रीय सहकार मंत्री श्री. अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली सहकारी संस्थांचा सर्वसमावेशक डेटाबेस तयार करण्याचे मंत्रालयाचे केलेले अथक प्रयत्न खरंच कौतुकास्पद आहेत. सहकार क्षेत्रात ६० हून अधिक महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आले आहेत. सहकार मंत्रालयाची स्थापना झाल्यापासूनच्या अवघ्या चार वर्षांत या क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती साधली गेली आहे.**




**(दै. आरंभ पर्व)**

केंद्रीय सहकार मंत्री श्री. अमित शहा यांनी पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या "सहकार से समृद्धि" या दृष्टिकोनाची पूर्तता करण्यासाठी कोणतीही कसर सोडलेली नाही. मंत्रालयाच्या स्थापनेनंतरच्या या चार वर्षांत सहकार क्षेत्राने परिवर्तनशील प्रगती साधली आहे. श्री. शाह यांच्या नेतृत्वाखाली सहकार चळवळीतील उणिवा त्वरित ओळखून त्यावर उपाययोजना केल्या गेल्या तसेच या क्षेत्राला नवी दिशा देणारे महत्त्वपूर्ण सुधार केले गेले. याला भारताच्या सहकारी चळवळीतील दुसरी क्रांती म्हटले तरी अतिशयोक्ती ठरणार नाही.

या काळात ६० पेक्षा अधिक निर्णायक उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली. सहकारी संस्थांचा डेटाबेस तयार करण्यासाठी मंत्रालयाचे प्रयत्न विशेष स्तुत्य आहेत. नमुना अधिनियमापासून उच्चस्तरीय संस्थांपर्यंत सर्व स्तरांवर सुधारणा करण्यात आल्या. कृषी, दुग्ध, मत्स्य व मीठ क्षेत्रांचा समावेश असलेल्या २ लाख नवीन प्राथमिक कृषी पतसंस्था (PACS) स्थापण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे, जेणेकरून सहकार प्रत्येक गावापर्यंत पोहोचेल. सहकारी संस्थांमध्ये पारदर्शकता व कार्यक्षमता वाढविण्यासाठी पॅक्सचे संगणकीकरण वेगाने सुरू आहे. राज्यांच्या सहकार्याने सहकारी संस्थांचे पुनरुज्जीवन करण्याची जबाबदारी श्री. शाह यांनी स्वतः घेतली आहे. जुनाट सहकारी कायद्यांमध्ये योग्य सुधारणा करण्यात आल्या असून नव्या तरतुदींचा समावेश केला गेला आहे.

सहकार क्षेत्रातील कायदेशीर सुधारणांचा भाग म्हणून बहुराज्य सहकारी संस्था कायद्यात सुधारणा करण्यात आल्या आहेत. तसेच सहकारी संस्थांच्या निवडणुकांवर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र केंद्रीय सहकारी निवडणूक प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे.

पॅक्स सक्षम करण्यासाठी त्यांना व्यावसायिक उपक्रमांशी जोडले गेले आहे आणि विविध मंत्रालयांच्या योजनांचे एकत्रीकरण केले गेले आहे. सहकारी चळवळीत युवकांना आकर्षित करण्यासाठी अनेक उपक्रम राबविण्यात आले आहेत. प्रशिक्षित व कुशल युवकांचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी सरकारने देशातील पहिले त्रिभुवन सहकारी विद्यापीठ स्थापन केले असून यावर्षापासून ते कार्यरत होणार आहे.

येथे सहकारी व्यवस्थापन, नेतृत्व, उद्योजकता, डिजिटल गव्हर्नन्स व धोरण-निर्मिती अशा विषयांवरील विशेष अभ्यासक्रम राबविण्यात येतील. शेतकऱ्यांच्या समस्यांकडे लक्ष देत श्री. शाह यांनी सरकारी साखर कारखान्यांना खाजगी व सार्वजनिक कारखान्यांप्रमाणेच समान संधी मिळवून दिल्या आहेत. त्यांचे कर व आर्थिक अडथळे दूर करण्यात आले आहेत.

राष्ट्रीय स्तरावर बियाणे, निर्यात व सेंद्रिय शेती या क्षेत्रांसाठी तीन सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. भारताच्या अन्नसुरक्षेसाठी सहकार क्षेत्राने जगातील सर्वात मोठा धान्यसाठा प्रकल्प हाती घेतला असून ग्रामपंचायत स्तरावर साठवण सुविधा उभारण्याचे काम सुरू झाले आहे. पायलट प्रकल्प पूर्ण झाला असून पहिला टप्पा सुरू आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी सोप्या करण्याच्या दिशेने सहकारी संस्थांना किमान आधारभूत किमतीवर (MSP) खरेदी करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. नाफेड व NCCF सारख्या सहकारी संस्था आता MSP दराने डाळी व तेलबिया खरेदी करत आहेत.

सरकारच्या पुढाकारामुळे सहकारी बँकांना आता सार्वजनिक व खासगी बँकांप्रमाणेच सुविधा मिळत आहेत. त्यांना नवीन शाखा सुरू करण्याची व व्यावसायिक उपक्रम विस्तार करण्याची परवानगी मिळाली आहे. राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (NCDC) च्या कर्जवितरणात अभूतपूर्व वाढ झाली असून यंदा अंदाजे ₹१.७५ लाख कोटी इतके कर्जवितरण होणार आहे. यामुळे सहकारी संस्थांची आर्थिक क्षमता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. गेल्या चार वर्षांत सहकार मंत्रालयाने ६० पेक्षा अधिक ऐतिहासिक उपक्रम हाती घेतले आहेत ज्याचा फायदा देशभरातील सहकारी संस्थांना झाला आहे.

भारताला समृद्ध व प्रभावी सहकार परंपरा लाभली आहे. ग्रामीण व कृषीआधारित अर्थव्यवस्थेत सहकार चळवळीची निर्णायक भूमिका राहिली आहे. आज देशात ८.५ लाखांहून अधिक सहकारी संस्था असून जवळपास २९ कोटी नागरिक सदस्य आहेत. शेती उत्पादन, ग्रामीण वित्त, गृहनिर्माण, विपणन, ग्राहक सेवा, दुग्ध, मत्स्य व इतर अनेक क्षेत्रांमध्ये या संस्था सक्रिय आहेत.

# समाजाविषयी तळमळ असलेले युवा नेतृत्व – सारंगदादा नवले

## वाढदिवस अभिष्टचिंतन विशेष

**शब्दांकन : लक्ष्मण साबळे (निवासी संपादक)**



(दै. आरंभ पर्व)

समाजकारणातील प्रामाणिकपणा, जनतेविषयी असलेली खरी तळमळ, समस्यांवर तोडगा काढण्याची हातोटी आणि नेहमीच सकारात्मक दृष्टिकोन ठेवणारे व्यक्तिमत्व म्हणजे सारंगदादा नवले. त्यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यकर्ते, नागरिक, तसेच मित्रपरिवारातून मोठ्या प्रमाणावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

राजकीय क्षेत्र असो व व्यावसायिक यामध्ये त्यांनी आपल्या कामगिरीने आपले नावलौकिक कमावले आहेत.

**राजकीय वाटचाल :** भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून सारंगदादा नवले यांनी राजकारणात सक्रिय पाऊल टाकले. युवा कार्यकर्त्यांमध्ये त्यांची लोकप्रियता लक्षणीय आहे. भाजपा युवा मोर्चाचे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी केवळ संघटनेची बांधणीच केली नाही, तर समाजकारणालाही गती दिली. केंद्रीय मंत्री मुरलीधर अण्णा मोहोळ, आमदार भीमराव तापकीर, मंत्री चंद्रकांतदादा पाटील, मंत्री माधुरीताई मिसाळ यांच्याशी असलेले घनिष्ठ संबंध आणि त्यांच्याकडून मिळालेली प्रेरणा यामुळे त्यांची राजकीय वाटचाल अधिक परिणामकारक ठरली आहे.



**सामाजिक बांधिलकी :** सारंग नवले हे फक्त राजकारणी म्हणून नव्हे, तर युवा उद्योजक व समाजसेवक म्हणूनही परिचित आहेत. त्यांनी अनेक आरोग्यविषयक उपक्रम राबवले असून, रक्तदान शिबिरे, मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, जनजागृती मोहिमा हे उपक्रम समाजातील सर्वसामान्य जनतेला थेट लाभदायक ठरले आहेत. लोकशाहीत मतदान हा नागरिकांचा मूलभूत हक्क आहे, हे लक्षात घेऊन त्यांनी विविध मोहिमांद्वारे मतदानाविषयी जनजागृती केली आहे.



**स्थानिक प्रश्नांवरील सातत्यपूर्ण पाठपुरावा :** धायरी परिसरात वाढती वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुरवस्था, सार्वजनिक सोयीसुविधांचा अभाव या प्रश्नांवर सारंगदादा यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. नागरिकांचे प्रश्न शासन दरबारी मांडून त्यावर ठोस निर्णय होण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आहेत. त्यामुळे परिसरातील तरुणाईसह ज्येष्ठ नागरिकांमध्येही त्यांचा विश्वासार्ह नेता म्हणून स्वीकार झाला आहे.

**कौटुंबिक परंपरेचा वारसा :** सारंग नवले हे राजकीय व सामाजिक परंपरेचा वारसा पुढे नेणारे नेतृत्व आहे. त्यांचे वडील बाळासाहेब नवले हे पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक राहिले असून, समाजकारणाच्या माध्यमातून त्यांनी लोकांची सेवा केली. तसेच त्यांची चुलती सौ. राजश्री नवले ह्या देखील पुणे महानगरपालिकेच्या सभासद राहिल्या आहेत. त्यामुळे नवले कुटुंबाने कायमच जनतेच्या सेवेस प्राधान्य दिले आहे. आता त्या परंपरेतून उभे राहिलेले पहिले युवा नेतृत्व म्हणजेच सारंगदादा नवले.

**लोकमान्यता आणि भविष्यकालीन अपेक्षा :** सारंगदादांचा शांत, मृदू स्वभाव, सर्वांना सोबत घेऊन जाण्याची वृत्ती आणि विचारसरणी यामुळे त्यांच्या नेतृत्वगुणांची प्रचीती नागरिकांना वारंवार येते. त्यांचे व्यक्तिमत्व आक्रमकतेपेक्षा संवादावर आधारित आहे, ज्यामुळे त्यांना सर्व स्तरांमधून पाठिंबा मिळतो.

आगामी महानगरपालिका निवडणुकांमध्ये ते महत्त्वाची भूमिका पार पाडतील, अशी सर्वसामान्यांमध्ये प्रबळ अपेक्षा आहे. परिसरातील तरुणाईकडून त्यांना मिळणारा पाठिंबा आणि ज्येष्ठ नागरिकांकडून मिळणारे मार्गदर्शन हे त्यांचे मोठे बळ आहे. त्यामुळे पुण्याच्या राजकारणात सारंगदादा नवले हे नाव अधिक ठळकपणे पुढे येईल, यात शंका नाही.

### जनतेची सेवा हाच वारसा

समाजाविषयी असलेले प्रश्न व त्यांची सेवा करण्याचे तत्व हे वडिलाकडून, परिवाराकडून शिकलो आहे. आगामी काळातही केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रकांत दादा पाटील मंत्री माधुरी मिसाळ आमदार भीमराव तापकीर यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी काळातील जनतेचे प्रश्न निश्चितपणे मांडले जातील. यासाठी मी कायम कटिबद्ध असणार आहे. - सारंग नवले, भारतीय जनता युवा मोर्चा मा. अध्यक्ष

## IBM द्वारा ग्लोबल एन्ट्रन्स टेस्टची घोषणा

**बेंगळूरू (दै. आरंभ पर्व) :** IBM ने त्यांच्या ग्लोबल एन्ट्रन्स टेस्टसाठी नोंदणी सुरु केली आहे, ही एक देशव्यापी परीक्षा आहे ज्या द्वारे विद्यार्थी संपूर्ण भारतातील निवडक विद्यापीठांमध्ये स्नातकोत्तर अभ्यासक्रमात प्रवेश मिळवू शकतात. नोंदणीची शेवटची तारीख 5 सप्टेंबर 2025 आहे. ऑनलाइन अर्ज https://www.ibmiceq2d.com/ या संकेतस्थळावर सादर केले जाऊ शकतात. ही परीक्षा MCA, M.Sc, व MBA या सारख्या स्नातकोत्तर पदव्या प्राप्त करण्यासाठी इच्छुक असणाऱ्या सर्व उमेदवारांसाठी खुली आहे. हे अभ्यासक्रम IBM च्या $Q^2D$ अभ्यासक्रमाशी त्यांच्या एकीकरणाद्वारे वेगळे ओळखले जात असून ते उद्यमाच्या उत्क्रांत होत असलेल्या गरजांशी उच्च शिक्षणास सुसंगत करण्यासाठी शैक्षणिक क्षेत्रातील भागिदारांशी सहकार्य करून विकसित करण्यात आले आहेत.

## पावसामुळे अमृतनगर भागातील घरात पाणी

### सचिन दोडके आले मदतीला धावून



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गेल्या दोन दिवसांपासून पुणे शहरात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे. या विसर्गामुळे सिंहगड रोडवरील अमृतनगर परिसरातील घरात पावसाचे पाणी शिरण्यास सुरुवात झाली.

घटनेची माहिती मिळताच नगरसेवक सचिन शिवाजीराव दोडके तातडीने मित्रमंडळी व पुणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसह घटनास्थळी धावून गेले. परिस्थितीची पाहणी करून त्यांनी स्थानिक नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्याची व्यवस्था केली. दोडके म्हणाले की, "या परिसरातील प्रत्येक नागरिकांच्या संपर्कात असून, आपत्ती काळात संपूर्ण मदत पोहोचविण्यास आम्ही कटिबद्ध आहोत." यावेळी स्थानिक प्रशासन, कार्यकर्ते व नागरिकांच्या मदतीने रहिवाशांना जवळच्या सोसायटीत हलवण्यात आले. सध्या परिसरात सतर्कतेचे वातावरण असून प्रशासन व लोकप्रतिनिधी यावर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.























# थोडक्यात




## शताब्दी वर्षानिमित सांस्कृतिक महोत्सव

- कला, संगीत व ध्यानाच्या माध्यमातून 'निर्वाण: ज्ञानप्राप्ती' या विषयाची मांडणी

पुणे (आरंभ पर्व) : त्रिरत्न इन्स्टिट्यूट आणि करुणदीप फाउंडेशन यांच्या सयुक्त विद्यमाने उग्यैन आर्ट फेस्टिव्हल हा भव्य सास्कृतिक सोहळा २१ ते २६ ऑगस्ट २०२५ या कालावधीत बालगंधर्व कला दालन, जंगली महाराज रोड, पुणे येथे आयोजित करण्यात येत आहे. हा महोत्सव त्रिरत्न बौद्ध समुदायाचे संस्थापक व आधुनिक बौद्ध पुनरुज्जीवनाचे अग्रणी उग्येन संघरक्षित (१९२५-२०१८) यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त साजरा करण्यात येणार आहे. अशी माहिती डॉ अस्मिता गायकवाड, मेडिकल डायरेक्टर फोट्रिया USA यांनी पत्रकार परिषदेत दिली. पत्रकार भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेला चंद्रशेखर दैठणकर (माजी. आय जी आय पी एस) डॉ. पद्माकर पंडित (मा. अधिष्ठाता वाय सी एम) डॉ. वि. दा. गायकवाड (मा.अधिष्ठाता कॅन्टोन्मेंट हॉस्पिटल पुणे) संतोष संखद (दादासाहेब फाळके पुरस्कार विजेता कला दिग्दर्शक) ध. तेजदर्शन निर्माता, सुप्रसिद्ध निवेदक दीपक म्हस्के आदि मान्यवर उपस्थित होते. 'निर्वाण: ज्ञानप्राप्ती' या विषयावर आधारित हा महोत्सव कला आणि धम्म यांचा संगम घडवणार आहे. प्रदर्शन, थेट कला सादरीकरणे, व्याख्याने, ध्यान कार्यशाळा आणि संगीत-नृत्य सादरीकरणाच्या माध्यमातून संघरक्षित यांच्या या विचाराला उजाळा दिला जाईल की कला ही आध्यात्मिक जाणिवेचे द्वार ठरू शकते. या महोत्सवात सहभागी होण्याकरिता देश व विदेशातून सुमारे 200 हून कलावंत व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.




## जवळगाव प्रकल्प शंभर टक्के भरला, ग्रामस्थांकडून जलपूजन

बार्शी (आरंभ पर्व) : बार्शी तालुक्यातील जवळगाव मध्यम प्रकल्प यंदा शंभर टक्के क्षमतेने भरला असून या प्रकल्पातून तब्बल 25 गावांना पाणीपुरवठा केला जात आहे. तसेच शेतकऱ्यांच्या शेतीसाठी आवश्यक पाण्याचा पुरवठा करून शेतीला दिलासा मिळणार आहे. या आनंददायी प्रसंगी प्रकल्प परिसरात ग्रामस्थांकडून जलपूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ नेते सुरेशभाऊ कापसे, औदुंबर आबा डिसले, नानासाहेब ढेंगळे, बाबासाहेब कापसे, रमेश ढेंगळे, रवींद्र कापसे, नंदू ढेंगळे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत जलपूजन सोहळा संपन्न झाला. यावेळी बोलताना सुरेश भाऊ कापसे यांनी समाधान व्यक्त करत शेतकरी बांधवांना याचा मोठा फायदा होणार असल्याचे मत व्यक्त केले. ग्रामीण भागात पिण्याचे पाणी तसेच शेतीसाठी होणारा पुरवठा ही अत्यंत आनंददायी बाब असल्याचे कापसे यांनी यावेळी सांगितले.

## पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी सचिन दोडके यांचे आयुक्तांकडे निवेदन



वारजे (आरंभ पर्व) : वारजे परिसरातील गोकुळ नगर भागात नागरिकांना पाणीपुरवठ्याचा प्रश्न गंभीर बनला असून, या भागातील नागरिकांना तातडीने पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी माजी नगरसेवक सचिन दोडके यांनी पुणे महापालिकेचे आयुक्त नवल राम किशोर यांच्याकडे भेटून निवेदनाद्वारे केली. वारजे परिसरातील गोकुळ नगर येथे 24/7 योजनेअंतर्गत पाणीपुरवठ्याची लाईन टाकण्यात आली असली तरी अद्याप पाणीपुरवठा सुरू झालेला नाही. त्यामुळे स्थानिक रहिवाश्यांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नासाठी सचिन दोडके यांनी आयुक्तांना भेटून तात्काळ पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी केली. यावेळी आयुक्त नवल राम किशोर यांनी या मागणीची गांभीर्याने दखल घेत तात्काळ कार्यवाही करून पाणीपुरवठा सुरू करण्याचे आश्वासन दिले. त्यांच्या या सकारात्मक प्रतिसादामुळे गोकुळ नगर परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण असून, दीर्घकाळ प्रलंबित असलेला पाण्याचा प्रश्न सुटण्याची आशा निर्माण झाली आहे. पाणी ही नागरिकांची मूलभूत गरज असून या समस्येवर त्वरित उपाययोजना केल्यास गोकुळ नगर भागातील रहिवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.



## #HarGharEmergencyReady मोहीम सुरू

पुणे (आरंभ पर्व) : शाळांना सुरक्षित करण्याच्या दिशेने महत्वपूर्ण पाऊल उचलत मणिपाल हॉस्पिटल्स पुणे आणि लिटल मिलेनियम प्रीस्कूल्स यांनी सहयोगाने सीपीआर आणि प्रथमोपचार प्रशिक्षण उपक्रम आयोजित केला, जेथे पुण्यातील 400 हून अधिक शिक्षक आणि सुविधा प्रदात्यांना जीवनरक्षक कौशल्यांसह सक्षम करण्यात आले. कोणत्याही शाळेतील शिक्षण देण्यासोबत काळजी वाहक शिक्षक वर्गात आणि वर्गाबाहेर आपत्कालीन परिस्थितीला आत्मविश्वासाने व प्रभावीपणे प्रतिसाद देण्यासाठी सुसज्ज असतील याची खात्री घेण्यासाठी हा सहयोग करण्यात आला.

# सारोळे गावचा अभिमान : जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला पुरस्कार




### अनेक समस्येवर उपाय करत शाळा बनली एक नंबर

**सारोळेतील ह्या जिल्हा परिषद शाळेला अनेक समस्यांनी ग्रासले होते. शिवाय वर्ग खोल्या नसतानाही विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम न करता प्रामाणिकपणे ज्ञानदानाचे काम केले. ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी सहकार्य करत तीन वर्गखोल्या मंजूर केले आणि शाळेचा महत्त्वाचा विषय मिटला. सर्वत्र इंग्रजी शाळांचा माहोल असताना सारोळे येथील शाळा विद्यार्थ्यांनी गजबजुन गेली आहे.. हे शिक्षकांचं कार्याची महती देणारी गोष्ट ठरली आहे.**

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

आचार्य दादासाहेब दोंदे प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था, वैराग यांच्या वतीने दिला जाणारा "आदर्श माझी शाळा" हा प्रतिष्ठेचा पुरस्कार यावर्षी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सारोळे यांना प्रदान करण्यात आला.

हा सन्मान सोहळा वैराग येथील हॉटेल चंद्रदीप येथे उत्साहात पार पडला. शाळेचे मुख्याध्यापक भास्कर पालकर सर, गावसाने सर, बाबर सर तसेच शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष -उपाध्यक्ष व पालक प्रतिनिधींनी उपस्थित राहून हा पुरस्कार स्वीकारला.

कार्यक्रमाला वैराग नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष मा. निरंजन भुमकर, जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाचे माजी सदस्य मा. मकरंद निंबाळकर, मा. संतोषदादा निंबाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. पतसंस्थेचे चेअरमन मा. कुलकर्णी सर व संचालक मंडळ यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले.

शाळेच्या प्रगतीबद्दल जिल्हा परिषदेचे गटशिक्षणाधिकारी बालाजी नाटके ,माजी जि.प. सदस्य संतोषदादा निंबाळकर, नगराध्यक्ष मा. निरंजन भुमकर यांच्यासह अनेक मान्यवरांनी अभिनंदन करून शाळेच्या शिक्षक व पालक समितीच्या कार्याचे कौतुक केले. या वेळी शालेय शिक्षण समिती अध्यक्ष श्री. कोंडीराम गाटे, पालक प्रतिनिधी आत्मलिंग मुंबरे तसेच सर्व शिक्षकवर्ग व पालक उपस्थित होते.

यावेळी सत्कार स्वीकारताना मुख्याध्यापक श्री. पालकर यांनी शाळेच्या सर्व शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांच्या संयुक्त प्रयत्नामुळेच हा सन्मान मिळाल्याचे सांगितले.

सारोळे गावचे माजी सरपंच मा. बाळराजे गाटे, सरपंच सौ. सुवर्णा काकडे व उपसरपंच जितेंद्र चौधरी यांनी शाळेच्या सर्व शिक्षकवर्ग, पालक व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

## मानसिक आजार व व्यसनमुक्तीसाठी ध्येय हवे : डॉ. सातव

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मानसिक आजारावर मात करण्यासाठी ध्येय घेऊन उपचार करायला हवे तरच आनंदी आणि निरोगी आयुष्य जगता येईल असे आयर्न मॅन आणि बालरोग तज्ञ डॉक्टर योगेश सातव यांनी सांगितले. झगडे वस्ती, मांजरी, पुणे येथील जागृती रिहॅबिलिटेशन सेंटर, मध्ये १५ ऑगस्ट २०२५ रोजी ७९ वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व ध्वजारोहणाने झाली. राष्ट्रगीताने वातावरण देशभक्तीने दुमदुमून गेले.कार्यक्रमाचे विशेष आकर्षण लेझीम, नृत्य, गीते व कवितांचे सादरीकरण होते. सूत्रसंचालनाची जबाबदारी वेदिजा फाले आणि विशेष म्हणजे, केंद्रातील रुग्णांनीच सूत्रसंचालन करून सर्वांचे मन जिंकले. या सोहळ्याचे मुख्य अतिथी "आयर्न मॅन" डॉ. योगेश सातव होते. कार्यक्रमाला संस्थापक व संचालक मानसोपचार तज्ञ डॉ. अमर शिंदे सर तसेच संचालिका श्रीमती विजया शिंदे डॉक्टर श्याम पाटील, डॉक्टर देवाशीश पाटील उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे : डॉ. योगेश सातव (बालरोगतज्ञ ,आयर्न मॅन) दक्षिण आफ्रिकेत झालेल्या जागतिक आयर्न मॅन मॅरेथॉन स्पर्धेत किताब पटकावणारे तसेच देश-विदेशातील अनेक मॅरेथॉनमध्ये सातत्याने सहभाग घेणारे सुप्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. योगेश सातव आपल्या प्रेरणादायी भाषणात म्हणाले की, "तुम्ही कोणत्याही व्यसनाच्या आहारी न जाता स्वतःच्या विकासासाठी किंवा व्यसनमुक्तीसाठी प्रयत्न केला पाहिजे.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व रोख पारितोषिक वितरण






**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

धामणगाव दुमाला येथील– स्व. मोहर लालासाहेब कांबळे (माजी मुख्याध्यापिका, जिल्हा परिषद शाळा) व मेजर लालासाहेब कडप्पा कांबळे (भारतीय सैन्य) यांच्या स्मरणार्थ लाल मोहर फाउंडेशनतर्फे १५ ऑगस्ट २०२५ रोजी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ व रोख पारितोषिक वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमात उत्तीर्ण व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम फाउंडेशनकडून करण्यात आले. यापुढेही अशा उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याचे काम सातत्याने चालू राहील, असे आयोजकांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून त्यांच्या कन्या सौ . मंजुषा हरिचंद्र धावारे तर उपाध्यक्ष शुभम कांबळे उपस्थित होते. तसेच कांबळे व धावारे परिवारातील सदस्य यश कांबळे, विशाखा शुभम कांबळे, समाधान ठेंगल, अमर कोरके, बापू कोरके आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाला जिल्हा परिषद शाळेचे सर्व शिक्षकवर्ग, मुख्याध्यापक जाधव गुरुजी व समस्त ग्रामस्थांनी उपस्थिती लावली. प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच एस. के. पाटील, डॉ. लक्ष्मण गाटे व गोरेताई यांनी हजेरी लावली.

यावेळी बोलताना डॉ. लक्ष्मण गाटे यांनी प्रत्येकाने संघर्षावर मात्र कठोर परिश्रम घेण्याची जिद्द ठेवली पाहिजे. नक्कीच यश मिळू शकते. असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यावेळी त्यांनी लाल मोहर फाउंडेशनने राबवलेल्या उपक्रमाचे कौतुक केले. अतिशय उत्साहात हा कार्यक्रम संपन्न झाला.

## शरदचंद्रजी पवार ई-लर्निंग स्कूल, वडगाव बुद्रुक येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**वडगाव (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका शाळा क्रमांक 203, शरदचंद्रजी पवार ई-लर्निंग स्कूल (सिंहगड रोड, वडगाव बुद्रुक) येथे भारतीय स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक व पिडीसी बँकेचे संचालक विकास नाना दांगट पाटील, पीएमपीएल वाहक व सामाजिक कार्यकर्ते तानाजी कांबळे, माजी नगरसेवक हरिदास भाऊ चरवड, दै. पुढारी चे ज्येष्ठ पत्रकार मिलिंद पानसरे, तसेच शरद भाऊ दबडे, सुनील भाऊ कांबळे आणि शालेय समितीच्या महिला पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.



प्रथम भारतमाता प्रतिमेचे पूजन व ध्वजपूजन सामाजिक कार्यकर्ते तानाजी कांबळे यांच्या हस्ते पार पडले. त्यानंतर ध्वजारोहण शालेय शिक्षण समितीच्या महिला अध्यक्ष व सदस्य यांच्या हस्ते करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, समूहगीत, मनोगते तसेच विविध प्रात्यक्षिके सादर केली.

कवायत, देशभक्तीपर कार्यक्रम व सांस्कृतिक उपक्रमांनी वातावरण भारावून गेले. सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते खाऊ वाटप करण्यात आले. मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व व उज्वल भविष्यासाठीचे नियोजन याबाबत प्रेरणादायी विचार दिले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. तनुजा बेनके मॅडम यांनी भूषवले. शिक्षकवृंदातील राम मोरे सर, शिर्के सर, काकडे मॅडम, स्वरांजली मॅडम यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांची उत्तम तयारी करून घेतली.

## रक्तदान शिबीर उत्साहात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हडपसर डॉक्टर्स स्पोर्ट्स क्लब (HDSC), जागृती रिहॅब्लीटेशन सेंटर व स्पंदन ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने महारक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. स्वातंत्र्यदिनानिमित्त विठ्ठलराव तुपे पाटील नाट्यसभागृह, हडपसर येथे महारक्तदान शिबिर (पाचवे वर्ष) अत्यंत उत्साहात पार पडले. शिबिराचे उद्घाटन दक्षिण आफ्रिकेत यशस्वीरीत्या पूर्ण झालेल्या जागतिक कॉम्रेड स्पर्धेतील डॉक्टर्स व स्थानिक डॉक्टर्स असोसिएशनचे पदाधिकारी यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन व छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रयोजन डॉ. सचिन पाटील यांनी आपल्या ओघवत्या वाणीने केले. शिबिराच्या सामाजिक उद्देशाबद्दल डॉ. योगेश सातव व डॉ. योगेश गायकवाड यांनी प्रतिनिधिक शुभेच्छा व्यक्त केल्या. या कार्यक्रमाला HMA चे माजी अध्यक्ष डॉ. रसिक गांधी, तसेच डॉ. शंतनू जगदाळे, डॉ. सचिन आबने, डॉ. मंगेश वाघ यांनी उपस्थित राहून आयोजकांचे कौतुक केले.

**विशेष वैशिष्ट्ये:**

- यंदाच्या शिबिरात महिला रक्तदात्यांचा उल्लेखनीय सहभाग दिसून आला.
- हडपसर पंचक्रोशीतून नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.
- विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी शिबिरास सदिच्छा भेट देऊन उपक्रमाचे कौतुक केले.

# जवळगाव मध्यम प्रकल्प शंभर टक्के भरला

### १५ गावांचा पाणी प्रश्न मिटला, शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण

**जवळगाव मधील प्रकल्प भरल्यामुळे शेतकरी निश्चित आनंदी आहे. शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. पाटबंधारे विभागाने पाण्याचे योग्य नियोजन करावे. जेणेकरून सिंचनाखालील शेतकरी व कालव्यावर अवलंबून असलेले शेतकरी या दोघांनाही फायदेशीर होईल असे पाण्याचे नियोजन करावे. - अमरभैय्या पाटील, शेतकरी सारोळे ता. बार्शी**

**शेतकऱ्यांची जीवनदायी असलेले हे धरण भरल्याने परिसरातील शेतकरी वर्गामध्ये समाधान निश्चित आहे. लवकरच जिल्हाध्यक्ष उमेश पाटील व मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये जलपूजन करण्यात येणार आहे.**
**- नागेश चव्हाण, नेते बार्शी तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस**



**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

बार्शी तालुक्यातील नागझरी नदीवरील जवळगाव मध्यम प्रकल्प यंदा शंभर टक्के क्षमतेने भरून १९ ऑगस्ट रोजी ओव्हरफ्लो झाला आहे. धरण भरल्यामुळे कालव्यांतून पाणी सोडण्यात आले असून याचा थेट लाभ सुमारे ३० गावांना होणार आहे. तसेच या प्रकल्पामुळे १५ गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार असल्याने ग्रामस्थ आणि शेतकरी वर्गामध्ये उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

धरणाची एकूण पाणी साठवण क्षमता ३४.९२ द.ल.घ.मी. असून त्यापैकी उपयुक्त साठा २९.१९ द.ल.घ.मी. इतका आहे. गेल्या आठवडाभरापासून धरण क्षेत्रात होत असलेल्या जोरदार पावसामुळे १९ ऑगस्ट रोजी सकाळी धरण पूर्ण क्षमतेने भरले. त्यामुळे त्याचा सांडवा सुटला आहे. या प्रकल्पामुळे सुमारे ६ हजार हेक्टर क्षेत्र कालव्याच्या पाण्याखाली येणार असून उचल पाणी योजनेंतर्गत आणखी ४ हजार हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येणार आहे. त्यामुळे परिसरातील रब्बी पिके, तसेच ऊस, द्राक्षे, केळी, सोयाबीन, कांदा, तूर, मूग, उडीद व ज्वारी या पिकांचे उत्पादन अधिक खात्रीशीर होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठा दिलासा मिळाल्याचे चित्र आहे.

दरम्यान, सातत्याने पडणाऱ्या पावसामुळे काही भागात सोयाबीन पिकांवर रोगराईचा प्रादुर्भाव होत आहे. मात्र धरण भरल्यामुळे रब्बीसह बागायती पिकांचे भवितव्य उज्ज्वल राहणार असल्याचा विश्वास शेतकरी व्यक्त करत आहेत.

जवळगाव प्रकल्प शंभर टक्के भरल्यामुळे परिसरातील गावांमध्ये आनंदाचे वातावरण असून धरण परिसरात ग्रामस्थ मोठ्या संख्येने येऊन जलपूजन करीत आहेत.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.